# पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर
## पोलीस भरती - २०१७

क्र. आस्था-३(१)/पो.भ.-२०१७/प्रारुप निवडयादी प्रसिध्द/२०१७, पुणे, दि.१३/६/२०१७

## कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या प्रारुप निवडयादीनुसार निवड झालेल्या उमेदवारांसाठी सुचना.

पोलीस भरती-२०१७ मध्ये कागदपत्र पडताळणीनंतर गुणवत्तेनुसार, सामाजिक/समांतर आरक्षणातंर्गत प्रारुप निवडयादी दिनांक ३०/०५/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. सदर प्रारुप निवडयादीनुसार निवड झालेल्या उमेदवारांनी पुणे पोलीस दलाच्या वेबसाईटवर टाकण्यांत आलेला चारित्र्य पडताळणी बाबतचा साक्षकंन नमुना भरुन, त्यावरील पान नं.६ येथील ओळख प्रमाणपत्रावर सक्षम असणा-या अधिका-यांची सही शिक्का घेऊन, नजिकच्या काळातील ६ फोटोसह **दिनांक २०/०६/२०१७ रोजी ०९.०० वा. शिवाजीनगर पोलीस मुख्यालय,पुणे शहर येथील शेड क्र.१ येथे** समक्ष उपस्थित राहावे.

सदरच्या प्रसिध्द केलेल्या प्रारुप निवडयादीमधील ज्या उमेदवारांच्या नांवासमोर कागदपत्र व खेळविषयक कागदपत्राच्या पडताळणीच्या अधीन राहुन निवड करण्यांत आल्या बाबतचा अभिप्राय नोंदविलेला आहे, अशा सर्व उमेदवारांनी त्यांच्या सर्व मुळ कागदपत्रा व त्याचा एक साक्षांकित केलेला झेरॉक्स संच पडताळणीसाठी बरोबर आणावा.

जे उमेदवार वर नमूद दिनांकास व वेळी गैरहजर राहतील त्यांचे नांव प्रारुप निवडयादीतुन कमी करुन, त्यांची झालेली निवड रद्द करण्यांत येईल. सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**ठिकाण :- पुणे**
**दिनांक :- १३/०६/२०१७.**

( साहेबराव पाटील )
अध्यक्ष, पोलीस भरती समिती -२०१७,तथा
अपर पोलीस आयुक्त,प्रशासन, पुणे शहर

E:\POLICE RECRUITMENT-2017\NOTTING-PB-17 - II.DOCX